डीपी रोड आणि पदपथांसाठी आज चांदिवलीत आंदोलन

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी) : चांदीवलीतील रखडलेला डीपी रोड आणि पदपथांसाठी आज रविवार दिनांक १२ फेब्रुवारी रोजी चांदिवलीतील सिटीझन वेलफेअर असोसिएशनच्या माध्यमातून आंदोलन करण्यात येणार असून प्रशासनाचे लक्ष वेधून घेणार आहेत. आज चांदीवली च्या ९० फूट रोडवर होणाऱ्या शांततापूर्ण आंदोलनासाठी सुमारे २५० च्या वर रहिवाशी सहभागी होणार आहेत. चांदीवली येथील रखडलेला डीपी रस्ता आणि रहदारीचा चांगले रस्ते व पादचाऱ्यांना अनुकूल पदपथ या मागण्यांसाठी सिटीझन वेलफेअर असोसिएशन ने वारंवार पत्रव्यवहार ईमेल करून बीएमसीकडे संपर्क साधला मात्र याकडे दुर्लक्ष केले जात असल्याने कंटाळलेल्या चांदिवली रहिवाशांनी आज १२ फेब्रुवारीला शांततापूर्ण आंदोलन करण्याची घोषणा केली असल्याचे असोसिएशनचे सदस्य मनदीप सिंग यांनी सांगितले. असोसिएशनच्या मागण्यांपैकी एक- चांदिवली फार्म रोडला जोगेश्वरी-विक्रोळी लिंक रोड ला जोडणारा ९० फूट रस्ता पूर्ण करणे अशा विविध मागण्यासाठी आंदोलन करून मुंबई महानगर पालिकेच्या अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेणार असल्याचे सिंग यांनी सांगितले.

भाजप मधुन राष्ट्रवादीत गेलेल्या माजी आमदार भोसलेंची २६ कोटींची संपत्ती जप्त

पुणे, दि. ११ (वार्ताहर) : तत्कालीन संचालकांनी शिवाजीराव भोसले बँकेतील ठेवीदारांची ७१ कोटी रुपयांची फसवणूक केली. या प्रकरणी पुणे शिवाजीनगर जिल्हा सत्र न्यायालयाने माजी आमदार अनिल भोसले यांच्या मालमत्तेवर टाच आणली होती. आता ईडीनेही अनिल भोसले यांची पुणे आणि कोल्हापूर जिल्ह्यातील मिळून २६ कोटी ६० लाख रुपयांची मालमत्ता जप्त केली आहे. या प्रकरणामध्ये अनिल भोसले यांना मागील वर्षी मार्च महिन्यात अटक झाली होती. पुण्यातील शिवाजीराव भोसले बँक गैरव्यवहार प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे विधान परिषदेतील माजी आमदार अनिल भोसले यांच्यांवर ही कारवाई करण्यात आली आहे.तर गैरव्यवहार प्रकरणात बँकेचे संचालक भोसले यांच्यासह सूर्याजी पांडुरंग जाधव, नूसर शनूर मुजावर यांच्यासह अन्य आरोपींवर यापुर्वीच गुन्हा दाखल झालेला आहे. माजी आमदार अनिल भोसले हे राष्ट्रवादी काँग्रेसचे विधान परिषदेचे सदस्य होते.राज्याचे विरोधी पक्ष नेते अजित पवार यांचे ते निकटवर्तीय होते.प ाण २०१७ मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत अनिल भोसले आणि अजित पवारांमध्ये पत्नी रेश्मा भोसले यांना तिकीट देण्यावरून वाद झाला होता.

'दहिसर मेट्रो स्थानक-मीरा रोड स्थानक' थेट बससेवा सोमवारपासून

मुंबई, दि. ११ (प्रतिनिधी) : प्रवाशांची वाढती मागणी लक्षात घेता बेस्टतर्फे नवीन बससेवा सुरू करण्यात येत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून दहिसर मेट्रो स्थानक ते मीरा रोडदरम्यान नवीन थेट बससेवा सोमवारपासून सुरू होणार आहे.

जानेवारी २०२३ पासून मुंबईतील प्रवाशांच्या सोयीकरिता मुंबई उपनगरमध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या वतीने दहिसर ते गुंदवली-अंधेरी (पूर्व) दरम्यान 'मेट्रो रेल-७' आणि दहिसर ते एसिक नगर अंधेरी (पश्चिम) दरम्यान 'मेट्रो रेल-२ ब' सुरू करण्यात आली आहे. मेट्रोतून उतरल्यानंतर आपल्या इच्छित स्थळी जाण्यासाठी प्रवाशांच्या सोयीसाठी बेस्ट उपक्रमाच्या नियमित बस उपलब्ध आहेत.

मात्र प्रवाशांची मागणी लक्षात घेता बेस्टतर्फे नवीन बसमार्गही सुरू केले जात आहेत. विशेषतः दहिसर मेट्रो रेल्वे स्थानकाकडे येणारे प्रवासी मोठ्या प्रमाणात मीरा रोड येथून येत असून या प्रवासाकरिता त्यांना बेस्ट उपक्रमाच्या सेवांवर अवलंबून राहावे लागत आहे. प्रवाशांची ही मागणी लक्षात घेता सोमवार १३ फेब्रुवारीपासून दहिसर मेट्रो स्थानक आणि मीरा रोड रेल्वे स्थानक (पूर्व) दरम्यान काशिमीरा, सिल्वर पार्क, जम्मू काश्मीर बँक मार्गे नवीन विशेष बसमार्ग क्र. पीपीएस-१ सुरू करण्यात येत आहे.

या बसमार्गावरील बस दहिसर मेट्रो स्थानक-मीरा रोड रेल्वे स्थानक (पूर्व) दरम्यान दहिसर चेकनाका - काशिमीरा - सिल्वर पार्क - जम्मू काश्मीर बँक - मीरा रोड रेल्वे स्थानक (पूर्व) दरम्यान धावेल.

मुख्यमंत्र्याच्या हस्ते बुधवारी केडीएमसीतील विविध प्रकल्पांचा लोकार्पण सोहळा

कल्याण, दि. ११ (वार्ताहर) : कल्याण डोंबिवली महानगर पालिकेतील स्मार्ट सिटी प्रकल्पाअंतर्गत प्रबोधनकार ठाकरे तलावातील सुशोभीकरणाचे लोकार्पण, अमृत योजने अंतर्गत प्रकल्प दोन एसटीपी प्लान्ट तसेच कल्याण व डोंबिवलीतील बीएसयूपी प्रकल्पातील ५१६ लाभार्थींनां सदनिका व व्यापारी गाळ्यांच्या चावी वाटपाचा कार्यक्रम बुधवारी १५ फेब्रुवारी रोजी कल्याणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते पार पडणार असल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली आहे. मुख्यमंत्र्याच्या नियोजित दौर्यामुळे शिवसेना शिंदे गटातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे. कल्याण डोंबिवली महानगर पालिका क्षेत्रात केंद्रशासनाच्या निधीतून बीएसयूपी स्मार्टसिटी, अमृत योजना अंतर्गत विविध प्रकल्प सुरू असून यातील काही प्रकल्पाची कामे पूर्णत्वास आली आहेत. कल्याणच्या काळा तलावाचे प्रबोधनकार ठाकरे तलाव असे नामकरण करत या तलावाचे स्मार्ट सिटीच्या माध्यमातून सुशोभिकरण करण्यात आले आहे. या तलावाच्या बाजूला शिवसेना प्रमुखांचे भव्य स्मारक उभारण्यात आले असून आता या तलावात तरंगते रेस्टोरंट, मनमोहक कारंजे यासह आकर्षक रंगरंगोटी करण्यात आली आहे. मागील दोन वर्षापासून सुरु असलेले हे काम पूर्ण झाले असून या तलावाचे लोकापर्ण मुख्यमंत्र्याच्या हस्ते केले जाणार आहे. तर मागील अनेक वर्षापासून वादात रखडलेल्या बीएसयुपीच्या घरांचा तिढा सोडवत खासदार डॉ श्रीकांत शिंदे यांनी या योजनेतील रिक्त घरे प्रकल्प बाधीतांना देण्याचा प्रस्ताव मांडला होता. यामुळे १४ वर्षापासून घराच्या प्रतीक्षेत असलेल्या रस्ता बाधितांना घरे मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या ५१६ लाभार्थ्यांना मुख्यमंत्र्याच्या हस्ते बीएसयुपी मधील घरे दिली जाणार आहेत.

तर अमृत योजनेतून पालिका प्रशासनाने शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करत नदीपात्रात जाणारे दुषित सांडपाणी रोखण्यासाठी मलशुद्धीकरण प्लांट उभारण्याचे काम सुरु केले असून यातील २६ एमएलडी क्षमतेच्या वाडेघर आणि २१ एमएलडी क्षमतेच्या आंबिवली मलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्ण झाले असून या दोन्ही केंद्रामुळे उल्हास नदीत जाणारे घातक सांडपाणी पूर्णपणे बंद होणार आहे.

कल्याण रेल्वे गुन्हे शाखेच्या पोलिसांनी हस्तगत केला ७ लाखांचा मुद्देमाल

सराईत चोराच्या आवळल्या मुसक्या

कल्याण, दि. ११ (वार्ताहर) : लांब पल्ल्याच्या गाडीत झोपेत असलेल्या प्रवाश्यांच्या मुद्देमालाची चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगाराच्या मुस्क्या आवळून त्याच्या कडून सुमारे ७ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात कल्याण रेल्वे गुन्हे शाखेच्या पोलिसांना मोठे यश आले आहे.

गुन्हे शाखेच्या पोलिसांना सुत्रांकडून मिळालेल्या माहीती नुसार दिनांक ३० जानेवारी २०२३ रोजी अहमदनगर - कोल्हापूर एक्सप्रेस ने प्रवास करणारी एक महिला प्रवासी झोपेत असतांना पहाटे २ ते ४ दरम्यान एका अज्ञात इसमाने त्यांच्या डोक्याजवळील लेडीज पर्स लंपास केली होती. या गुन्ह्याची नोंद डोंबिवली रेल्वे पोलिस ठाण्यात करण्यात आली होती. याच गुन्हाचा तपास करत असतांना संशयीत आरोपी वसई रेल्वे पोलिस ठाणे हद्दीतील सी.सी.टी.व्ही. मध्ये कैद झाल्याचे दिसून आले होते.

या आधारे संशयीताचा शोध घेत असतांना सुभान अहमद जहरी अहमद वय वर्ष ४१ रा. डहाणू जिल्हा पालघर हा असल्याचे निष्पन्न झाले होते.

या संशयीताला शिताफीने अटक करून त्याची सखोल चौकशी केली असता या आरोपीच्या नावे अशाच प्रकारचे आणखी ३ गुन्हे कल्याण रेल्वे पोलिस ठाण्यात दाखल असल्याची माहीती मिळाली.

या चारही गुन्ह्यात आरोपीने लंपास केलेला सात लाख २९ हजार ४९८ इतक्या रकमेचा मुद्देमात हस्तगत करण्यात आला आहे यात ४ मोबाईल तसेच दागिन्यांचा समावेश आहे.

हे गुन्हे उघड करण्यात पोलिस आयुक्त (लोहमार्ग - मुंबई) डॉ. रविंद्र शिसवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपायुक्त मनोज पाटील, मध्य परिमंडळ सहा. आयुक्त (गुन्हे) सचिन कदम, वपोनि (गुन्हे) अरशुद्दीन शेख यांचे मार्गदर्शनासह पोलिस अंमलदार राजेंद्र दिवटे, महेंद्र कर्डिले, रविन्द्र ठाकूर, अजित माने, अक्षय चव्हाण आदींचे सहकार्य लाभले.

पान १ वरून...

सेंद्रिय शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना राज्य सरकार सर्वोतोपरी मदत करेल

आज पर्यावरणीय हानीच्या अनेक घटना आपण पाहत आहोत. त्सुनामी, अतिवृष्टी, भूकंप, महापूर या सारख्या अनेक समस्याना आज जगाला तोंड द्यावे लागत आहे. यासाठी आपण जागृती करणे गरजेचे आहे. ही गरज ओळखून काडसिद्धेश्वर स्वामीजींच्या संकल्पनेनुसार कोल्हापुरातील सिद्धगिरी मठ येथे सुमंगलम् हा पर्यावरणीय लोकोत्सव होत आहे ही आपल्या राज्यासाठी गौरवाची बाब आहे.

या उत्सवाबद्दल बोलताना काडसिद्धेश्वर स्वामी यांनी म्हणाले की, या उत्सवात पारंपरिक सेंद्रिय पद्धतीच्या शेतीचे रोल मॉडेल प्रत्यक्षात पाहता येणार आहे. देशी बियाणे, जैविक खत, जैविक कीड नियंत्रक प्रक्रिया समजून घेता येणार आहेत. त्यामुळे रासायनिक विषमुक्त अन्न-धान्याकडे टाकलेले ते एक समग्र पाऊल ठरेल. तसेच देशात पहिल्यांदाच देशी प्रजातीच्या गाई, म्हैशी, बकऱ्या, घोडे, गाढव, कुत्रे व मांजर यांचे अनोखे प्रदर्शनही भरवण्यात येणार आहे. त्यामुळे देशी जाती प्रजातींचे संगोपन व संवर्धनाची व्याप्ती वाढण्यास मदत होईल. लोकोत्सवात सहभागी होणाऱ्या लोकांना काडसिदेश्वर स्वामी यांनी सोबत एक किलो प्लास्टिक कचरा सोबत आणण्याचे आवाहन केले आहे. येथे गोळा होणाऱ्या कचऱ्यापासून रिसायकलिंग युनिटमधून त्या कचऱ्याचे पुनर्निमिती प्रक्रिया लोकांना पाहता येणार आहे. यामुळे समाजातील युवकांना एक नवीन दिशा निश्चितच मिळू शकते.

सुमूका ॲग्रो इंडस्ट्रिज लिमिटेड

(पूर्वीचे सुपर्ब पेपर्स लिमिटेड म्हणून ज्ञात)

नोंदणीकृत कार्यालय : दुकान क्र. १ व ७, तळ मजला, एम्प्रेस चेंबर्स, प्लॉट क्र. ८९ए व बी, सेक्टर १, एनकेजीएसबी बँकच्या समोर, कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७.

सीआयएन : L74110MH1989PLC289950 ईमेल : sumukaagro@gmail.com वेबसाइट : www.sumukagro.com

३१.१२.२०२२ रोजी संपलेल्या तिमाही अखेरकरिता अलेखापरिक्षीत वित्तीय निष्कर्षाचा अहवाल

रु. लाखात

अनु. क्र	विवरण	तिमाही अखेर ३१.१२.२०२२ अलेखापरीक्षित	तिमाही अखेर ३०.०९.२०२२ अलेखापरीक्षित	तिमाही अखेर ३१.१२.२०२१ अलेखापरीक्षित	वर्ष अखेर ३१.०३.२०२२ लेखापरीक्षित
१.	कार्यचलनातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	६८२	५७५	२०	१३९
२.	कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (करपूर्व, अतिरिक्त व/वा अतिविशेष बाबी)	७७	५५	१	३२
३.	कर पूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अतिरिक्त व/वा अतिविशेष बाबी पश्चात)	७७	५५	१	३२
४.	कर पश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अतिरिक्त व/वा अतिविशेष बाबी पश्चात)	७७	५५	१	२४
५.	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता समाविष्ट नफा/(तोटा) (कर पश्चपात) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात)	७७	५५	१	२४
६.	प्रदानित इक्विटी शेअर्स भांडवल	७१	७१	५४	५४
७.	राखीव (गत वर्षाच्या ताळेबंदामध्ये निर्देशित मूल्यांकन राखीव वगळता)	-	-	-	-
८.	उत्पन्न प्रति शेअर (रु. १०/- प्रत्येकी)				
	(चालू व खंडित कार्यचलनाकरिता)				
	मूळ	१.०९	०.७७	०.०१	०.४३
	सौम्य	१.०९	०.७७	०.०१	०.४३

टीप :

१. वरील हे दि. ११ फेब्रुवारी, २०२३ अखेर संचालक मंडळाच्या सभेमध्ये मंजूर व लेखा समिती द्वारे वरील अलेखापरीक्षित वित्तीय अहवाल मर्यादित केला आहे. २. कंपनीचा वैधानिक लेखापरीक्षक दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी अखेर तिमाहीकरिता मर्यादित अहवालामध्ये पार पाडला आहे. ३. कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १३३ अंतर्गत कंपनी (भारतीय लेखा अहवाल) नियम २०१५ मध्ये विहित इंडियन अकाउंटिंग स्टँडर्ड्स (आयएनडी एएस) यांच्यासह अनुपालन असून वित्तीय अहवाल तयार केला आहे. ४. गत कालावधीची आकडेवारी रिग्रुप्ड केली आहे ज्याअर्थी आवश्यक अनुसार सध्याचा कालावधी असेल. ५. दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी अखेर तिमाही दरम्यान कंपनीने एक सेगमेंटमध्ये कंपनी कार्यरत आहे त्यामुळे सेगमेंट अहवाल आवश्यक नाही आहे.

सुमूका ॲग्रो इंडस्ट्रिज लिमिटेडकरिता
सही/-
(परेश ठक्कर)
व्यवस्थापकीय संचालक
डीआयएन : ०७३३६३९०

ठिकाण : मुंबई
दिनांक : ११.०२.२०२३

INDOSTAR HOME FINANCE PRIVATE LIMITED

Registered Office : Unit No. 305, 3rd Floor, Wing 2/E, Corporate Avenue, Andheri- Ghatkopar Link Road, Chakala, Andheri (East), Mumbai – 400093
Email :- connect@indostarhfc.com CIN Number: - U65990MH2016PTC271587
Contact No.: -Mr. Nikhil Chitre, 9769381371

[परिशिष्ट - ४ - ए]
[पहा नियम ८ [६] च्या तरतुदी पहा]
स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेट्स अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ तसेच त्यासह वाचा सिक्युरिटी इंटरेस्ट [इन्फोर्समेंट] नियम २००२ ची तरतूद ८ [६] अनुसार स्थावर मालमत्तांच्या विक्रीसाठी इ लिलाव विक्री सूचना

याद्वारे आम जनता आणि विशेषतः कर्जदार यांना सूचित करण्यात येते की खालील प्रमाणे नमूद केलेल्या प्रतिभूत मालमत्ताचा ताबा इंडोस्टार होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड [यापुढे ज्यांचा उल्लेख संरक्षित धनको असा करण्यात येणार आहे] यांचे प्राधिकृत अधीकारी यांच्याकडून सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल असेट्स अँड इन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ चच्या अनुसार प्राप्त झालेल्या अधिकारांच्या अनुसार कर्जदार यांचेकडून येणे असलेली थकीत रक्कम वसूल कारण्यासाठी घेण्याबाबत बोली निम्नस्वाक्षरीकार यांच्याकडून खालील प्रमाणे नमूद केलेल्या अचल मालमत्ता खरेदी कारण्यासाठी, आमंत्रित करण्यात येत आहेत ज्या ऑनलाईन आमचे सेल्स आणि मार्केटिंग आणि इ लिलाव सेवा भागीदार मेसर्स इन्व्हेन्ट ऑन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड [इन्व्हेन्ट ऑन] यांचे वेब पोर्टल म्हणजेच https ://auctions.inventon.in येथे सादर करणे आवश्यक आहे.

कर्जदार यांचे लक्ष कायद्याच्या कलम १३ चे उपकलम [८] कडे वेधून घेण्यात येत आहे ज्या अंतर्गत त्यांना त्यांच्या संरक्षित मालमत्ता रिडिम करण्यासाठी कालावधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. सदरील मालमत्ता प्रत्यक्ष ताब्यात "जशी आहे, जिथे आहे", "जशी आहे, तशी आहे", "जे आहे, ते आहे" आणि "नो रिकोर्स" तत्वावर आहे जिचा तपशील खालील प्रमाणे नमूद केल्यानुसार आहे.

कर्जदार यांचा तपशील	कलम १३ [२] अनुसार मागणी सूचनेची तारीख आणि रक्कम	मालमत्तेचा तपशील	राखीव किंमत / ईएमडी / बोली वाढविण्याची रक्कम	इ लिलावाची तारीख आणि वेळ
एलएनव्हीआयआरओएचएल - ०६१८०००२५१८ आणि एलएनव्हीआयआरओएचएल - ०६१८०००२५१९ शाखा : मुंबई विरार कर्जदार : श्री सुनील कुमार हिरालाल तिवारी सहकर्जदार : श्रीमती कांचन सुनीलकुमार तिवारी	१३/०१/२०२२ रु ८,३९,१५१ / - (रुपये आठ लाख एकोणचाळीस हजार एकशे एकावन्न पैसे शून्य मात्र करिता) दिनांक २४/१२/२१ रोजी अधिक त्यावरील त्या पुढील व्याज, शुल्क आणि अन्य आकार संपूर्ण रक्कम अदा होण्याच्या तारखेपर्यंत.	मालमत्ता : २०६, होम स्वीट होम, मौजे गुरवली, समृद्धी बंगलो १ जवळ, महाराष्ट्र, भारत ४२१ ००२ चतुःसीमा : उत्तर : अंतर्गत रस्ता भूखंड, दक्षिण : खुला भूखंड, पूर्व : बंगला, पश्चिम : खुला भूखंड.	रु ७,००,००० /- / रु ७०,००० / - / रु १०,००० / -	२८/०२/२०२३ वेळ : सकाळी १०. ३० वाजता ते ११. ३० वाजता त्यासह ५ मिनिटांचा अमर्यादित वाढावा

इ लिलावाच्या अटी आणि शर्ती

१. विक्रीच्या सविस्तर अटी आणि शर्ती जाणून घेण्यासाठी कृपया www.indostarhfc.com येथे उपलब्ध करून देण्यात आलेली लिंक पाहावी आणि आमच्या सेल्स आणि मार्केटिंग तसेच इ लिलाव सेवा पुरवठादार https ://auctions.invention.in संरक्षित धनको यांचे संकेतस्थळ पाहावे.
२. त्या आमचे संकेतस्थळ येथे https ://www.indostarhfc.com /Auction - Notices येथे लिंकच्या अंतर्गत प्रकाशित करण्यात आल्या आहेत.
३ कोणत्याही स्वरूपाची माहिती, चौकशी आणि मालमत्तेची पाहणी, सहायय, इ लिलावाची प्रक्रिया आणि ऑनलाईन प्रशिक्षण यांच्यासाठी बोलीदार यांनी क्लायंट सर्व्हिस डिलिव्हरी [सीएसडी] विभाग आमचे सेल्स आणि मार्केटिंग आणि इ लिलाव सेवा भागीदार मेसर्स इन्व्हेंटन सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी दूरध्वनी क्रमांक : + ९१ ९८३३४७८७४८ / ९०२९०८६३२१ आणि इ मेल तपशील : care@inventon.net किंवा manoj.das@inventon.net किंवा प्राधिकृत अधिकारी आइचेपीएल, श्री निखिल चित्रे यांच्याशी ९७६९३८१३७१ संपर्क साधावा.

सूचना : कृपया नोंद घ्यावी की संरक्षित धनको हे सर्व कर्जदार यांना स्पीड पोस्ट / रजिस्टर्ड पोस्टच्या माध्यमातून विक्री सूचना जारी करणार आहेत. जर ती कोणत्याही पक्षकाराने स्वीकारली नाही अथवा त्यांना प्राप्त झाली नाही तर विक्री सूचनेचे प्रकाशन हे पर्यायी सेवेचे माध्यम म्हणून गृहीत धरण्यात येईल.

स्थळ : महाराष्ट्र
दिनांक : ११/०२/२०२३

स्वाक्षरी /-
प्राधिकृत अधिकारी
इंडोस्टार होम फायनान्स प्रायव्हेट लिमिटेड

इंडियन बैंक Indian Bank
इलाहाबाद ALLAHABAD

वसई पश्चिम शाखा
१, होमेज भवन, भाबोला नाका, वसई पश्चिम, जिल्हा पालघर पिन ४०१ २०२.
ईमेल : vasai@indianbank.co.in

ताबा सूचना (स्थावर मालमत्तेकरिता)
(सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८(१) अंतर्गत)

ज्याअर्थी, अधोहस्ताक्षरीत इंडियन बँक यांच्या प्राधिकृत अधिकारी यांनी सीक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल असेट्स ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सीक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ व सीक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या अनुच्छेद १३ (१२) (नियम ३ सहवाचिता) अंतर्गत प्राप्त अधिकारान्वये कर्जदार **श्री. विनोद रवी कुमार (कर्जदार व गहाणवटदार) व श्री. रवी सुकुमार मेनन (सह-कर्जदार व गहाणवटदार) यांना मागणी सूचनेमध्ये निर्देशित रक्कमेचे प्रदान रु. २५४७४०२/- (रु. पंचवीस लाख सत्तेचाळीस हजार चारशे दोन मात्र) दि. २९.०७.२०२२** अनुसार पुढील व्याज दि. २९.०७.२०२२ पासूनचे प्रासंगिक खर्च, मूल्य, प्रभार आदी या रक्कमेचे प्रदान सदर सूचनेच्या स्विकृती तारखेपासून ६० दिवसांच्या आत करण्याकरिता मागणी सूचना दि. ०१.०८.२०२२ रोजी जारी केली होती.

कर्जदार/हमीदार/गहाणवटदार यांनी सदर रकमेचा भरणा करण्यास कसूर केली असल्याने, सदर सूचना कर्जदार/हमीदार/गहाणवटदार व आम जनतेस देण्यात येत आहे की, अधोहस्ताक्षरित यांनी नियम ८ सहवाचन सदर ॲक्टच्या अनुच्छेद १३ (४) अंतर्गत सहवाचन त्यांना प्राप्त अधिकारान्वये खालील निर्देशित मालमत्तेचा दि. ०७ फेब्रुवारी, २०२३ रोजी ताबा घेतला आहे.

विशेषत: कर्जदार/हमीदार/गहाणवटदार व आम जनतेस इशारा देण्यात येत आहे की, त्यांनी सदर मालमत्तेसंदर्भात व्यवहार करू नये व असे कोणतेही व्यवहार हे इंडियन बँक यांच्या प्रभारांतर्गत रु. २५४७४०२/- चे प्रदान दि. २९.०७.२०२२ अनुसार त्यावरील पुढील व्याजाचे प्रदान होईपर्यंत व प्रासंगिक खर्च, मूल्य, प्रभार आदी मागणी सूचनेच्या तारखेपासून रकमेच्या अधीन असतील.

कायद्याचे अनुच्छेद १३ च्या उप-अनुच्छेद (८) च्या तरतुदींअंतर्गत उपलब्ध कालावधीमध्ये प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी कर्जदारांचे लक्ष वेधून घेण्यात येत आहे.

स्थावर मालमत्तेचे विवरण :

फ्लॅट क्र. ए-१०३, मोज. ४९९ चौ. फूट सुपर बीयूए, १ ला मजला, बिल्डींग जय सिद्धीविनायक को-ऑप. हा. सो. लि. म्हणून ज्ञात, सर्व तो भाग व भूखंडावरील बांधकामित एन. ए. जमिन धारक सर्व्हे क्र. ९६, हिस्सा क्र. १ धारक गाव उमेलमन, बरमपूर, फिरंगी अँजेल रोड, कर्मा बिल्डींगजवळ, तालूका वसई, जिल्हा पालघर पिन ४०१ २०२.

दि. ०७.०२.२०२३
ठिकाण : वसई

सही/-
प्राधिकृत अधिकारी,
इंडियन बँक

RISA INTERNATIONAL LTD

CIN: L99999MH1993PLC071062
7, PLOT - 27/33, BEAUMON CHAMBERS, NAGINDAS MASTER LANE, HUTATMA CHOWK, FORT MUMBAI Mumbai City - 400001
email: risainternationalltd@gmail.com, website: www.risainternational.in

Extract of Unaudited Standalone Financial Results for the quarter and nine months ended on 31st December, 2022

(Rs. In Lakhs except EPS)

SL No.	Particulars	Quarter Ended 31.12.2022 Unaudited	Quarter Ended 30.09.2022 Unaudited	Quarter Ended 31.12.2021 Unaudited	Nine Months Ended 31.12.2022 Unaudited	Nine Months Ended 31.12.2021 Unaudited	Year Ended 31.03.2022 Audited
A	Income from Operations	0.00	0.00			0.00	0.00
B	Other Income	0.00	0.00	0.00	0.00	13.09	0.10
1	**Total Income**	**0.00**	**0.00**	**0.00**	**0.00**	**13.09**	**0.10**
2	Net Profits/ (Loss) for the period (before tax, exceptional and/ or extraordinary items)	(4.79)	(9.17)	(5.54)	(19.86)	(8.81)	(40.27)
3	Net Profits/ (Loss) for the period before tax (after exceptional and/ or extraordinary items)	(4.79)	(9.17)	(5.54)	(19.86)	(8.81)	(40.27)
4	Net Profits/ (Loss) for the period after tax (after exceptional and/ or extraordinary items)	(4.79)	(9.17)	(5.54)	(19.86)	(8.81)	(40.27)
5	Total comprehensive income for the period [Comprising Profit for the period (after tax) and Other Comprehensive income (after tax)]	(4.79)	(9.17)	(5.54)	(19.86)	(8.81)	(40.27)
6	Equity Share Capital (Face Value of Rs. 2/- each)	3190.0050	3190.0050	3190.0050	3190.0050	3190.0050	3190.0050
7	Earning Per Share						
	1. Basic	0.00	(0.01)	0.00	(0.01)	(0.01)	(0.03)
	2. Diluted	0.00	(0.01)	0.00	(0.01)	(0.01)	(0.03)

Notes:
1 The Financial Results of the Company for the quarter and nine months 31st December, 2022 have been prepared in accordance with Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. These results have been reviewed and recommended by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company in their respective meetings held on 11th February, 2023. The Statutory Auditors of the Company have carried out Audit of these results.
2 Previous year's figures have been rearranged/ regrouped wherever necessary.
3 These financial results are available on the Company's website www.risainternational.in and website of BSE where the equity shares of the Company are listed.

For and on behalf of the Board
Abhinandan Jain
Wholetime Director & CFO
DIN: 03199953

Place : Mumbai
Date : 11/02/2023

व्हीएक्सएल इन्स्ट्रुमेंट्स लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : क्र. २५२, ५ वा मजला, बिल्डींग क्र. २, सॉलिटेअर कॉर्पोरेट पार्क चकाला, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०९३, महाराष्ट्र
दूर. २२ २८२४ ५२१० फॅक्स : ९१ २२४२८७ २१९७ ईमेल : cfo@vxl.net वेबसाइट : www.vxl.net
सीआयएन : L85110MH1986PLC272426

दि. ३१ डिसेंबर, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही अखेरकरिता अलेखापरीक्षित वित्तीय अहवालाचा सारांश

(रु. लाखात उत्पन्न प्रति शेअर वगळता)

अनु. क्र.	विवरण	३ महिने अखेर अलेखापरीक्षित ३१.१२.२०२२	प्रक्रिया ३ महिने अखेर अलेखापरीक्षित ३०.०९.२०२२	गत वर्षामधील ३ महिने अखेर समाविष्ट अलेखापरीक्षित ३१.१२.२०२१	सध्या चालू कालावधी अखेरकरिता आकडेवारी अलेखापरीक्षित ३१.१२.२०२२	गत कालावधी अखेरकरिता आकडेवारी व तारीख अलेखापरीक्षित ३१.१२.२०२१	पूर्व वित्त वर्ष अखेर लेखापरीक्षित ३१.०३.२०२२
१.	कार्यचलनातून एकूण उत्पन्न (निव्वळ)	१८६.८२	२७५.७६	२५४.७०	७३८.८८	९१३.६०	१,३५७.२९
२.	कालावधीकरिता निव्वळ नफा/तोटा (कर पूर्व, अतिरिक्त व/वा अतिविशेष बाबी)	(६९.०२)	(३५.७७)	(३१.४८)	(१०३.६८)	(७०.५९)	(१९.०९)
३.	कर पश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/तोटा (अतिरिक्त व/वा अतिविशेष बाबी पश्चात)	(६९.०२)	११.४४	(३१.४८)	(५६.४७)	(७०.५९)	(१९.०९)
४.	कर पश्चात कालावधीकरिता निव्वळ नफा/ तोटा (अतिरिक्त बाबी व/वा अतिविशेष बाबी पूर्व)	(६९.०२)	११.४४	(३१.४८)	(५६.४७)	(७०.५९)	(९.६७)
५.	कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीकरिता समाविष्ट नफा/ तोटा (कर पश्चात) व अन्य सर्वसमावेशक उत्पन्न (कर पश्चात)	(६९.०२)	११.४४	(३१.४८)	(५६.४७)	(७०.५९)	(६.५२)
६.	इक्विटी शेअर भांडवल	१,३३२.४८	१,३३२.४८	१,३३२.४८	१,३३२.४८	१,३३२.४८	१,३३२.४८
७.	उत्पन्न प्रति शेअर (रु. १०/- प्रत्येकी)						
	(चालू व खंडित कार्यचलनाकरिता)						
	१. मूळ	(०.५२)	०.०९	(०.२४)	(०.४२)	(०.५३)	(०.०५)
	२. सौम्य	(०.५२)	०.०९	(०.२४)	(०.४२)	(०.५३)	(०.०५)

टीप : वरील अहवाल सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ च्या विनियमन ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंज सह दाखल विस्तृत तिमाही अखेरकरिताचा सारांश आहे. तिमाही वित्तीय अहवालाचा संपूर्ण प्रारूप स्टॉक एक्सचेंज वेबसाइट www.bseindia.com व कंपनीची वेबसाइट www.vxi.net वर उपलब्ध आहे.

ठिकाण : बेंगलुरु
दि. ११.०२.२०२३

एम. व्ही. शेट्टी
संपूर्ण वेळ संचालक
डीआयएन ००५१५७